**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. २८१/२०२१.** **निशाणी क्र.३६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | श्रीमती शबाना फय्याज मुल्ला, |
| वय | – | ३९ वर्षे, |
| नेमणुक | – | महिला पोलीस हवालदार ब.क्र.१२३१, पो.स्टे भूम. |
| राहणार | – | पोलीस स्टेशन भूम ता. भूम जि. धाराशिव. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.एस.बी.सय्यद साहेब यांचे मार्फत –**

दिनांक २०.०८.२०२१ रोजी मी पोलीस ठाणे परंडा महिला पोलीस नाईक म्हणुन कार्यरत होते. सारीका अनिल गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन ऑफिसर यांनी गु.र.क्र. २८४ हा दाखल करुन तपासाकरीता माझ्याकडे दिला. त्यानंतर मी दिनांक २१.०८.२०२१ रोजी घटनास्थळावर जावुन नमुद पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा करुन आरोपीने वापरलेली काठी घटनास्थळावरुन फिर्यादीने दिली, ती नमुद पंचांसमक्ष जप्त केली. घटनास्थळ हे फिर्यादीच्या रहाते घरी भोत्रा रोड भिमनगर परंडा हे होते. आता मला घटनास्थळासह काठी जप्ती पंचनामा निशाणी क्र. २६ दाखविण्यात आला तो तोच आहे, त्यावर माझी तसेच पंचांच्या सहया आहेत. जागेचा पुरावा म्हणुन फिर्यादीचे घरचे लाईट बील हस्तगत केले. आता मला लाईट बील दाखविण्यात आले, ते तेच आहे. त्यास **निशाणी क्र. ३७** देण्यात आले. त्यानंतर फिर्यादीस झालेल्या जखमांचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले व साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्यामुळे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

केले. आता मला काठी आर्टिकल अ दाखविण्यात आली, ती तिच आहे. मी आरोपींना ओळखते. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. ए.डी.खरसडे यांचे मार्फत –**

मी फिर्यादीच्या घराच्या मालकी संदर्भात इतर कोणतेही दस्तऐवज जप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेले लाईट बील हे फिर्यादीच्या घराचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावरुन काठी जप्त केलेली नाही. हे मला माहित नाही की, साक्षीदार लक्ष्मी नितीन बनसोडे ही फिर्यादीची भावजय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.08.07 16:25:06 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–०७.०८.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.